स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्यविद्या शाखेअंतर्गत मराठी विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवी करिता संशोधन आराखडा

संशोधनाचा विषय

संत तुकारामांच्या अभंगांची प्रासंगिकता : एक चिकित्सक अभ्यास

संशोधक

श्री श्रीकांत विठ्ठलराव थगनारे

(एम.ए. मराठी, शिक्षणशास्त्र सेट, बी.पी.एड., बी.एड.)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. केशव पाटील

(एम.ए., बी.एड., एम.फील., पीएच.डी.)

मराठी विभाग

शाहीर अण्णाभाऊ साठे महाविद्यालय, मुखेड जि. नांदेड – ४३१७१५

मराठी संशोधन केंद्र

भाषा,वाङमय व संस्कृती अभ्यास संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड – ४३१६०६

वर्ष – २०२४

संत तुकारामांच्या अभंगांची प्रासंगिकता : एक चिकित्सक अभ्यास

प्रस्तावना :-

महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे. संतांच्या अभंगवाणीने महाराष्ट्राची जडणघडण झाली. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत सावता, संत गोरोबा, चोखोबा, जनाई, मुक्ताई, निळोबा असे अनेक संत महाराष्ट्र भूमीत होऊन गेले. समाज प्रबोधनाची लोकचळवळ संतानी चालवून मानव जातीवर कल्याणकारी संस्कार केले. अध्यात्म, सदाचार आणि जीवन मुल्यांची पेरणी या भूमीत प्रथम संतांनी केली. सामान्य माणसाला भक्तिमार्ग अतिशय सोपा करून सांगण्याचे काम वारकरी संप्रदायातील संतांनी केले. ईश्वर प्राप्तीसाठी कोणतीही अवघड साधना करण्याची गरज नाही. कठीण अशा प्रकारच्या योगाचीही आवश्यकता नाही. शुद्ध आचरण व शुद्ध भाव ठेवून नामस्मरण करावे, ईश्वराची आराधना करावी यातूनच माणूस आणि देव यांच्यातील अंतर कमी होवून मानवता हीच ईश्वरसेवा हा संदेश संतांनी जनमाणसांना दिला.

वारकरी संप्रदायाला भागवत संप्रदाय असेही संबोधले जाते.

'ज्ञानदेवे रचिला पाया | तुका झालासे कळस ||'

या उक्तीप्रमाणे भागवत संप्रदायाचा पाया ज्ञानेश्वरांनी रचला तर तुकोबांनी त्यावर कळस चढविला. सतराव्या शतकात तुकारामांची अभंगवाणी महाराष्ट्रात गुंजन घालत होती. कर्मकांडावर, अनिष्ट रूढी-परंपरावर तुकोबा प्रहार करीत होते. ईश्वराच्या प्राप्तीसाठी संन्यास घेवून वनात जाण्याची आवश्यकता नाही.

'न लगती सायास जावे वनांतरा |

सुखे येतो घरा नारायण ||'

प्रपंच सोडण्याची आवश्यकता नाही. प्रपंचात राहूनही ईश्वर प्राप्ती करता येते. त्यासाठी प्रपंचावरील आसक्ती मात्र सोडली पाहिजे. कर्मकांडापेक्षा भक्तिमार्ग सोपा आहे. श्रेष्ठ आहे असे तुकोबा आपल्या अभंगांचीतून ठणकावून सांगत होते. तत्कालीन धर्माच्या ठेकेदारांना मात्र हे रुचले नाही. त्यांनी तुकोबाचा अतोनात छळ केला तरी सुद्धा तुकोबा डगमगले नाहीत. त्यांनी या धर्माच्या ठेकेदारांना खडे बोल सुनावले.

'वेदाचा तो अर्थ आम्हाशीच ठावा | येरांनी वहावा भार माथा ||'

या शब्दात त्यांनी धर्म मार्तंडाना सुनावले.

साधी सोपी रसाळ भाषा वापरून तुकोबांनी जन सामन्यांचे प्रबोधन केले. त्यांच्या वाणीचे सामर्थ्य जबरदस्त होते. ती थेट सामन्यांच्या -हदयाला भिडत होती. तुकोबाचे अभंग म्हणजे त्यांची स्वतंत्र प्रतिभा आहे. आज चारशे वर्षे झाली तरी त्यांची वाणी अविट आहे. सबंध मानवी -हदयात ती घर करून बसली आहे. अनेक अशिक्षित लोकांना सुद्धा त्यांची अभंगवाणी मुखोदगत आहे. वारकऱ्याच्या घरा-घरात त्यांच्या अभंग गाथेची पारायणे आजही केली जातात. वारकरी, अशिक्षितामध्येच नाही तर अनेक सुशिक्षित, अभ्यासक, विद्वानामध्येही तुकोबाची अभंगवाणी प्रिय आहे.

तुकोबाच्या अभंगवाणीने मानवता, समता, बंधुता ही आजच्या लोकशाहीची मुल्ये सतराव्या शतकात समाज परिवर्तनासाठी आपल्या लेखणीतून आणि वाणीतून जन सामान्यांना पोटतिडकीने सांगितली. म्हणून तुकोबा परिवर्तनशील व्यक्तीमत्वाचे आद्यगुरू ठरतात. म्हणून त्यांच्या मुखातून वाहणाऱ्या वेदांत वाणीने तत्कालीन धर्म मार्तंडांना हादरे दिले.

तत्कालीन समाजातील लोकांनाच तुकोबांचे अभंग उपयुक्त होते असे नव्हे तर आजही तुकोबांची अभंगवाणी तेवढीच महत्वपूर्ण, दिशादर्शक आणि व्यवहार उपयोगी आहे.

आज तुकोबांचे साधारण चार हजार अभंग उपलब्ध आहेत. यातील काही अभंग हे आजच्या लोकांचे प्रतिनिधित्व करतांना दिसतात. वर्तमानातील समस्येवर तुकोबांच्या अभंगांतून उत्तरे मिळतात. वर्तमान मनुष्य अशांतीने हैराण झाला आहे. त्याचे जीवन स्थिर नाही. ते चंचल झाले आहे. तो सारखा शांती मिळावी, समाधान मिळावे म्हणून धावतो आहे. वर्तमान कालीन व्यक्ती समोर अनेक समस्या आहेत. या समस्येवर उत्तर शोधण्यासाठी त्यांच्या काही निवडक अभंगांचा विचार करता येतो. आजही मानवी कल्याणासाठी, विकासासाठी आणि व्यक्तीच्या मनोबल उन्नतीसाठी तुकोबांची अभंग रचना उपयुक्त आहे.

गृहीतके :-

संत तुकारामांच्या अभंगांचे स्वरुप व वैशिष्टे मांडली आहेत.

सामाजिक सुधारणा, विवेकवादी विचार इत्यादीच्या प्रसारासाठी संत तुकारामांच्या अभंगांचा चांगला उपयोग होऊ शकतो.

संत तुकारामांच्या अनेक अभंगांतून सामाजिक प्रबोधनाबरोबर प्रासंगिकता व्यक्त झालेली दिसते.

आजच्या सामाजिक परिस्थितीतही संत तुकारामांच्या अभंगांतील विचार उपयोगी आहेत.

संत तुकारामांच्या अभंगांच्या चिकित्सक अभ्यासाद्वारे त्यांच्या अभंगांतील प्रासंगिकता अभ्यासता येते.

संशोधनाची उद्दिष्ट्ये :

संत तुकारामांच्या अभंगांचे स्वरुप, प्रेरणा व वैशिष्ट्यांचा शोध घेणे.

संत तुकारामांच्या अभंगांतील प्रासंगिकतेचा शोध घेणे.

संत तुकारामांच्या अभंगांतील आधुनिक विचारांचा शोध घेणे.

संत तुकारामांच्या अभंगांचे वर्तमानकालीन महत्व चिकित्सक पद्धतीने शोधणे.

संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

प्रस्तुत संशोधन हे संत तुकारामांची अभंगगाथा व तद्नुषंगाने उपलब्ध असणाऱ्या साहित्यापुरतेच व्याप्त असून त्यांच्या एकूण अभंगांपैकी निवडक अभंगांचा यात समावेश केला जाणार आहे. संत तुकारामांच्या अभंगांतील प्रासंगिकता मांडणारे अभंग यांच्यापर्यंत मर्यादित आहे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधन कार्य पूर्ण करण्यासाठी वर्णनात्मक, विश्लेषणात्मक अशा संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

संत तुकारामांच्या अभंगांतील प्रासंगिकतेचा अभ्यास करण्यासाठी काही प्रकरणे निश्चित केली आहेत. या प्रकरणाचा संशोधनाच्या पातळीवर विचार करणे अनिवार्य ठरते. संत तुकारामांच्या अभंगांतील प्रासंगिकतेचा अभ्यास करतांना संत तुकारामाची गाथा विश्लेषणात्मक ग्रंथ, समीक्षात्मक ग्रंथ, संत साहित्यावरील संदर्भग्रंथ, शब्दकोश, विश्वकोष इ. चा संदर्भ लक्षात घेतला जाणार आहे.

संशोधनाची साधने :

प्रस्तुत संशोधनासाठी संदर्भ साधने म्हणून अनेक विद्वान अभ्यासकांनी लिहिलेल्या ग्रंथाचा आधार घेण्यात येणार आहे. ‘सार्थ तुकाराम गाथा भाष्य’ शंकर महाराज कंधारकर तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ यांनी प्रकाशित केलेली, ‘संत तुकाराम बावांच्या अभंगांची गाथा प्रमाणभूत मानून आधारासाठी घेतली आहे. या बरोबरच वारकरी संप्रदाया संदर्भात सखोल माहिती

असलेले संदर्भ ग्रंथ, त्या संदर्भाने केलेले लेखन, संशोधन साहित्य, शब्दकोष, ज्ञानकोष इ.चा वापर केला जाणार आहे. तसेच कीर्तनकार, शिक्षणतज्ञ, विचारवंत यांच्या मुलाखती चर्चाद्वारे माहिती मिळविण्यात येणार आहे.

कारवाईचे टप्पे :

प्रथमतः संशोधन समस्येचा शोध घेवून त्या संशोधनाची गरज, महत्व, समस्या विधान, संशोधनाची उद्दिष्टे, गृहीतके, मर्यादांची मांडणी करणे त्यानंतर संबंधित साहित्याचा आढावा घेणे, निवडलेल्या पद्धतीनुसार माहितीचे अर्थनिर्वचन, विश्लेषण करणे, शेवटी निष्कर्ष मांडणे, शिफारशी व पुढील संशोधनासाठी विषय सुचविणे.

प्रकरण योजना :

प्रस्तावना :

प्रकरण : पहिले - वारकरी संप्रदाय : निर्मिती व परंपरा

बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात महानुभाव संप्रदायाचा प्रभाव हळूहळू ओसरू लागला आणि वारकरी संप्रदायाची मुहूर्तमेढ ज्ञानेश्वरांनी रोवली. ज्ञानेश्वरांनी अभंग गाथा, ज्ञानेश्वरी, अमृतानुभव ग्रंथ लिहिले आणि बोकाळलेल्या कर्मकांडापासून समाजाचे रक्षण केले. त्याच बरोबर तत्कालीन सर्व संताना नामदेव, सावता, चोखोबा, जनाई इत्यादींना एकत्र आणून खऱ्याअर्थाने अध्यात्मिक लोकशाहीचे बीजारोपण केले व पुढे चालून तुकोबाच्या रूपाने हा वटवृक्ष विस्तार पावला. तुकोबाच्या नंतर निळोबांनी ही धुरा सांभाळली.

प्रकरण : दुसरे - संत तुकारामांच्या अभंगांचे स्वरुप, प्रेरणा व वैशिष्ट्ये

प्राचीन मराठी साहित्यात वारकरी संप्रदायातील संतांनी विकसित केलेला 'अभंग' हा काव्यप्रकार आहे. संत नामदेवापासून ते सतराव्या शतकातील निळोबा पर्यंतच्या सर्व संतांनी हा काव्य प्रकार हाताळला. कधीही भंग न पावणारा तो 'अभंग' असेही अभंगाचे महत्व प्रतिपादन केले जाते.

अभंगाचे दोन प्रकार पडतात. मोठा अभंग व लहान अभंग. मोठ्या अभंगात प्रत्येक चरणांचे चार खंड पडतात. तर लहान अभंगात प्रत्येक चरणांचे दोन खंड पडतात. व शेवटी यमक जुळवलेले असते. उदा.

जे का रंजले गांजले | त्यासी म्हणे जो आपुले ||
तोची साधू ओळखावा | देव तेथेची जाणावा ||

संत तुकारामांनी मोठ्या व लहान दोन्ही प्रकारच्या अभंगांची रचना केलेली आहे. कांही अभंग हे तीन चरणांचे आहेत. तर कांही अभंग हे चार, पाच, सहा चरणांचे आहेत. अभंगांची रचना गेयता पूर्ण आहे.

तुकोबांच्या अभंगातून विठ्ठल भेटीची तळमळ दिसून येते, विठ्ठल भेटीसाठी ते आतुर झालेले दिसून येतात. उदा.

कन्या सासू-यासी जाये | मागे परतोनी पाहे ||
तैसे झाले माझ्या जीवा | तेंव्हा भेटसी केशवा ||

देव भोळेपणा, धर्मातील चुकीच्या समजुती या विरुद्धही तुकोबा आवाज उठवतात. त्यांच्या अभंगातून समाज उद्धाराची त्यांना असलेली तळमळ प्रगट होते. त्याच बरोबर विठ्ठल भक्ती, विठ्ठलाचे स्वरुप, संत महिमा, नाम महिमा, उपदेश, वेळेचे महत्व, शब्दांचे महत्व, अभ्यासाचे महत्व, निसर्गप्रेम, पंढरी महिमा, असे कितीतरी विषय व्यक्त झालेले दिसून येतात.

महाराष्ट्रातील बहुतांशी कीर्तनकार निरूपणासाठी तुकारामांचाच अभंग घेतात. एवढी त्यांच्या अभंगांची लोकप्रियता आहे.

प्रकरण : तिसरे - संत तुकारामांच्या अभंगांचा जनमानसावरील प्रभाव

संत तुकारामांच्या अभंगवाणीमुळे समाज परिवर्तनाची चळवळ सुरु झाल्याचे दिसून येते. अनेक लोकांनी व्यसनाचा त्याग केलेला दिसतो. कीर्तनाच्या माध्यमातून नैतिक मूल्यांचे संस्कार झाल्याचे जाणवते. कर्मकांड, बुवाबाजीचे सत्य लोकांना पटले आहे. पर्यावरण रक्षणाची जाणीव झाल्याचे दिसून येते. जनसामान्यांच्या ऱ्हदयात प्रवेश करून त्यांच्या वाणीने क्रांतिकारक बदल घडवून आणल्याचे दिसते. त्यांच्या अभंगवाणीतून जगण्याचे बळ मिळते.

प्रकरण : चौथे - संत तुकारामांच्या अभंगांचा वर्तमानकालीन अन्वयार्थ

संत तुकारामांनी बहुजन समाजाला खऱ्या अर्थाने जागे केले. देव, धर्म या संबंधीच्या भ्रामक कल्पना लोकांना पटवून देण्याचे कार्य त्यांनी केले. भ्रामक समजुती, वाईट रूढी-परंपरा नष्ट करण्याचा प्रयत्न केला. व धर्म क्रांती घडवून आणली. धर्माला नवीन विचारांची बैठक प्राप्त करून

दिली. समाजातील अंधश्रद्धा दूर करण्याचा व समाजाला नवी दिशा देण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला दिसून येतो. अभंगांच्या माध्यमातून त्यांनी केलेले प्रबोधन आजही समाजाला दिशादर्शक ठरलेले आहे. त्यांचे अभंग तत्कालीन समाजालाच उपयुक्त होते असे नव्हे तर वर्तमानकालीन व्यक्तीलाही उपकारक ठरलेले आहेत.

त्यांच्या अभंगवाणीतून प्रयत्नवाद, वैज्ञानिक दृष्टी, नैतिक मुल्यांची रुजवणूक, स्वातंत्र्य, समता, बंधुता या लोकशाही मुल्यांचे संस्कार, पर्यावरणाचे रक्षण इ. मूल्यांची रुजवणूक करता येते. वैज्ञानिक विचारांचा अंगीकार करता येतो. तुकोबा म्हणतात, 'नवस सायासाने मुले होत असतील तर पती करण्याची काय गरज आहे?'

नवसे कन्या पुत्र होती | मग का करणे लागे पती ||

अभ्यासाने असाध्य वाटणाऱ्या गोष्टीही साध्य होतात. दैववादाला झिडकारून तुकोबा प्रयत्नवादाचा स्वीकार करतात. वर्तमानकाळात कोणत्याही क्षेत्राचा जर विचार केला तर जीवघेण्या स्पर्धा निर्माण झाल्या आहेत. या स्पर्धेत टिकायचे असेल, आपल्या ध्येयापर्यंत पोहोचायचे असेल तर दैववादी बनून, आळशी राहून चालणार नाही. तर प्रयत्नवादी बनले पाहिजे.

असाध्य ते साध्य करिता सायास | कारण अभ्यास तुका म्हणे ||

वर्तमानकालीन व्यक्ती समोर अनेक समस्या आहेत. जसे की, पर्यावरणाचा ऱ्हास, अंधश्रद्धा, धार्मिक भेद, जातीभेद, वर्णभेद, राजकीय या सर्व समस्यावर तुकोबांच्या अभंगांतील विचार उपयुक्त आहेत.

प्रकरण : पाचवे - संत तुकारामांच्या अभंगांची वाङ्मयीन चिकित्सा

संत तुकारामांची भाव कविता म्हणजे अभंग. अभंग म्हटला की, तो फक्त तुकारामांचाच एवढी लोकप्रियता त्यांच्या अभंगांना मिळाली. त्यांच्या काव्यातील गोडवा व रसाळता अद्वितीय आहे. त्यांची अभंगवाणी अखंड ज्ञानाचा स्त्रोत आहे. त्यांची वाणी प्रासादिक आहे. त्यामुळे सुमारे चारशे वर्षापासून ती मराठी मनावर अधिराज्य गाजवत आहे.

एखादे तत्व पटवून देण्यासाठी तुकाराम अनेक अभंगातून दृष्टांत अलंकाराचा खुबीने वापर करतात. जी माणसं मोठी असतात त्यांना अनेक यातना होतात. हे सांगतांना तुकोबा म्हणतात,

लहानपण देगा देवा | मुंगी साखरेचा रवा ||

मोठेपणा पेक्षा लहानपणातच सुख आहे.

अंगी नम्रता धारण केल्याने कोणतेही संकट आले तरी ते दूर होते. हा विचार समाजाच्या गळी उतरवतांना तुकोबा म्हणतात,

महापूरे झाडे जाती | तेथे लोहाळे वाचती ||

अशी कितीतरी उदाहरणे, दाखले तुकोबा देतात. माणूस हा त्यांच्या अभंगांचा केंद्रबिंदू आहे. आपल्या आजूबाजूच्या परिसरातील पशू, पक्षी, प्राणी, वनस्पती इ.चा उदाहरणासाठी वापर करतात. लोक भाषेत त्यांच्या अनेक अभंगांचा सुभाषितासारखा वापर केला जातो. उदा.

जया अंगी मोठेपण | तया यातना कठीण ||
नाही निर्मळ जीवन | काय करील साबण ||
असाध्य ते साध्य करिता सायास | कारण अभ्यास तुका म्हणे ||

त्यांची भाषा साधी, सोपी, रसाळ आहे. त्यामुळे ती जनसामान्यांना आपली वाटते. ती जनसामन्यांच्या थेट ऱ्हदयात प्रवेश करते. यमक साधल्यामुळे रचना गेयपूर्ण झालेली आहे. त्यामुळे ती सुमारे चार शतके सुशिक्षित व अशिक्षितांच्या ओठी गुणगुणत आहे.

प्रकरण : सहावे - निष्कर्ष

संदर्भसूची :

1. **भालचंद्र नेमाडे** - तुकाराम, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, द्वितीय आवृत्ती, २००१
2. **शंकर महाराज कंधारकर** - श्री तुकाराम महाराज गाथा भाष्य, वै. शंकर महाराज कंधारकर, विश्वस्त संस्था, उदगीर. चौथी आवृत्ती, १९९८.
3. **हभप बंडोबोवा कराडकर -** अभंग गाथा, संत वाङमय प्रसारक मंडळ, कराड चौथी आवृत्ती, १९९९
4. **विष्णुबुवा जोग महाराज -** सार्थ श्री तुकारामाची गाथा प्रकाशक, श्री केशव भिकाजी ढवळे, गिरगाव मुंबई, आवृत्ती बारावी १९९८
5. **श्री तुकाराम अभंगांची गाथा -** सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. पुनर्मुद्रण १९७३.
6. **रमेश काकुळते पाटील -** स्वयंभू संत तुकाराम महाराज, पंचफुला प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, २०१५

7. **कवडे पां. बा. -** संतश्रेष्ठ तुकाराम महाराज, सनय प्रकाशन, नारायणगाव पुणे, प्रथम आवृत्ती - २०२१
8. **देशपांडे अ. ना. -** प्राचीन मराठी वाङःमयाचा इतिहास, खंड पहिला, व्हीनस प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती - १९९५
9. **डॉ. आ.ह्. साळुंखे -** तुकारामांचा शेतकरी,लोकायत प्रकाशन सातारा.
10. **जोशी प्र.ण. -** मराठी वाङःमयाचा विवेचक इतिहास, प्राचीन काळ, प्रसाद प्रकाशन पुणे १९९८
11. **डॉ. सदानंद मोरे** - तुकाराम दर्शन, सकाळ प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, २०२१
12. **डॉ. आ. ह्. साळुंखे** - विद्रोही तुकाराम, लोकायत प्रकाशन, सातारा, तृतीय आवृत्ती , २०१०
13. **डॉ. प्र. भा. काळे -** नामाचा तुका, जगद्‌गुरू तुकोबाराय साहित्य परिषद, शाखा उमरखेड, आवृत्ती प्रथमावृत्ती २००२
14. **डॉ. किशोर सानप -** समग्र तुकाराम दर्शन, विजय प्रकाशन, सीताबर्डी नागपूर, पुनर्मुद्रण जून २०१३
15. **डॉ. पी. ए. अहिरे -** शैक्षणिक संशोधन पद्धती, अथर्व पब्लिकेशन जळगाव
16. **डॉ. भिंताडे वी.रा. -** शैक्षणिक संशोधन पद्धती, नित्य नूतन प्रकाशन, पुणे - २००६
17. **प्राचार्य डॉ. के.यु. घोरमोडे -** शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे.

संशोधक

श्री श्रीकांत विठ्ठलराव थगनारे
(एम.ए. मराठी, शिक्षणशास्त्र सेट, बी.पी.एड., बी.एड.)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. केशव पाटील
(एम.ए., बी.एड., एम.फील., पीएच.डी.)
मराठी विभाग
शाहीर अण्णाभाऊ साठे महाविद्यालय, मुखेड
जि. नांदेड – ४३१७१५